**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN(o): 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 7.384
Volume - 8, Issue - 5, May - 2025

DOIs:10.2018/SS/202505010 --:-- Research Paper / Article / Review

# CORE (COnnecting REpositories) : मुक्त प्रवेश रीपोझीटरी

**डॉ. हितेश गोपाळ ब्रिजवासी**
ग्रंथपाल, के.ए.के.पी संस्थेचे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, जळगाव
hiteshbrijwasi07@gmail.com
**डॉ. तुषार मल्हारराव पाटील,**
ग्रंथपाल, एस.एस.व्ही.पी.एस संस्थेचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, शिंदखेडा

**सारांश :** देशांतर्गत विकास आणि उच्च शिक्षणाची गुणवत्ता ही संशोधन कार्यावर अवलंबून असते. संशोधन कोणतेही असो ते पूर्ण करण्यासाठी आवश्यक असते ते म्हणजे पूर्व साहित्याचा आढावा या शिवाय संशोधन ज्या क्षेत्रात करावयाचे आहे त्या क्षेत्रात अगोदर झालेल्या संशोधनाची माहिती होत नाही तसेच ज्या क्षेत्रात संशोधन करावयाचे आहे त्या क्षेत्रात सध्य सुरु असलेल्या इतर घडामोडींची देखील माहिती साहित्य अवलोकनामुळेच होते. म्हणून संशोधन कार्यासाठी साहित्य अवलोकन किंवा पूर्व साहित्याचा आढावा अतिशय महत्वाचा असतो. पूर्वसाहित्याच्या अवलोकनासाठी पुस्तके, नियतकालिके, ई-पुस्तके, डेटाबेस, मुद्रित व अमुद्रित प्रकाशने इत्यादी संसाधने उपयुक्त ठरतात. संशोधकांना पूर्व साहित्याचा आढावा घेण्यासाठी बऱ्याचदा अडचणींचा सामना करावा लागतो. साहित्य शोधण्यासाठी लागणारा वेळ, पैसा, प्रवास आणि संसाधनांची कमतरता अशा अनेक अडचणींचा यांत समावेश होतो. या सर्व बाबी लक्षात घेवून संशोधन कार्यास गती मिळून देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या CORE या बिब्लिओग्राफी डेटाबेसची निर्मिती करण्यात आली असून. या शोध निबंधात CORE या बिब्लिओग्राफी डेटाबेसचा विश्श्लेषण करण्यात आले आहे.

**शोध संज्ञा :** CORE संपूर्ण संदर्भात्मक डेटाबेस, मुक्त प्रवेश संग्रहण, शैक्षणिक साहित्य इत्यादी डिजिटल संग्रहण.

**1. प्रस्तावना :** आज अनेक प्रकारचे माहिती व ज्ञान संसाधने निर्माण होत आहे. अगदी पारंपरिक पुस्तकांपासून तर दृक्श्राव्य संसाधने उपलब्ध झाली आहे तसेच दररोज होणाऱ्या संशोधन कार्यामुळे माहितीचा विस्फोट झाला आहे. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे देखील माहिती व ज्ञान प्रसारणाचे मार्ग बदलले आहे. छापील पुस्तके, इलेक्ट्रॉनिक प्रकाशाने, दृक्श्राव्य संसाधने यांचा प्रचार आणि प्रसार वाढला आहे. तसेच मोबाईल व इंटरनेटच्या अतिवापरामुळे माहिती शोधण्याचा पद्धती देखील बदलल्या आहेत. नुसतेच ग्रंथालयीन संसाधने नव्हे तर पूर्ण संपूर्ण ग्रंथालयच मानवाच्या हातात आले आहे. परिणामी ऑनलाईन संसाधनांची मागणी वाढत आहे. मात्र दर्जेदार आणि अद्ययावत माहितीच्या शोधासाठी दर्जेदार शोध निबंधांची आणि नियतकालिकांची गरज भासते. मात्र या महागाईच्या काळात छापील नियतकालिके किंवा डेटाबेसेस यांची मोठ्या प्रमाणात उपलब्धता करून देणे मोठ मोठ्या ग्रंथालयांना देखील शक्य होते नाही. म्हणून मुक्त प्रवेश (Open Access) संसाधनांची गरज भासू लागली. अनेक संस्थांनी पुढकार घेवून यासाठी प्रयत्न केले व आज अनेक मुक्त प्रवेश संग्रहण (Open Access Repositories) तयार झाले आहे. या शोधनिबंधात अशाच एका मुक्त प्रवेश संग्रहणचा सविस्तर अभ्यास करून आशय विश्लेषण करण्यात आले आहे.

**2. संशोधन पद्धती :** या संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधनातील आशय विश्लेषण पद्धत वापरली जाणार आहे. यासाठी https://core.ac.uk/about या संकेतस्थळाचा वापर केला गेला आहे.

**मुक्त प्रवेश चळवळ (Open Access Initiative) :** मुक्त प्रवेश उपक्रम ही एक चळवळ असून या माध्यमातून संशोधक, प्राध्यपक, विद्यार्थी आणि ज्ञानार्जन करू इच्छीणाऱ्या प्रत्येक अभ्यासकाला उत्तम दर्जाचे शैक्षणिक व शोध प्रकाशने विनामूल्य आणि सहज पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. तसेच अशा प्रकाशनाच्या वापरासाठी होणारा खर्च आणि प्रवास वाचून संशोधन कार्य अधिक गतिमान करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. इ.स. १९९० च्या सुरवातीला मुक्त प्रवेश चळवळीची सुरवात पॉल गिन्स्पर्ग यांनी 1991 मध्ये स्थापन केलेल्या arXiv या उपक्रमांद्वारे

झाली. प्रकल्पातून या भौतिकशास्त्र विषयाच्या संशोधनास मुक्त प्रवेश प्रदान झाला. आगामी काळात २००२ मध्ये बुडापेस्ट ओपन ॲक्सेस इनिशिएटिव्ह (BOAI) द्वारे या चळवळीला अधिक गती मिळाली. यांत अनेक

शास्त्रज्ञांनी संशोधनामध्ये मुक्तता आणण्यात यावी असे सुचविले. मुक्त प्रवेश चळवळीतील आणखीन काही महत्वाचे टप्पे आहेत यामध्ये इ.स. २००३ सालाचे ओपन ॲक्सेस पब्लिशिंगवरील बेथेस्डा स्टेटमेंट आणि बर्लिन डिक्लेरेशन ऑन ओपन ॲक्सेस टू नॉलेज यांचा देखील समावेश आहे.

**3. CORE (COnnecting REpositories) बद्दल माहिती :** इ.स. २०१० साली डॉ. पेत्र नॉथ यांनी ओपन युनिव्हर्सिटी, यूके च्या नॉलेज मीडिया इन्स्टिट्यूट येथे एक संशोधन प्रकल्प म्हणून CORE ची स्थापना केली. जगभरातील मुक्त प्रवेश शोध निबंधांचा एकत्रीकरण करणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश होता. यांनतर इ.स. २०११ मध्ये CORE ला Joint Information Systems Committee (Jisc) कडून पहिले अनुदानप्राप्त झाले. या अनुदातून CORE च्या कार्याला चालना मिळाली आणि CORE उपक्रम आज जागतिक स्तरावरील मुक्त संशोधन आणि प्रवेशसुलभतेला समर्थन देणारे एक संपूर्ण शैक्षणिक अधोसंरचना सेवा बनली आहे. हा जगातील सर्वात मोठा मुक्त प्रवेश संशोधन पेपरांचा संग्रह असून जगभरातील विविध मुक्त प्रवेश संशोधन लेखांच्या डेटाबेस ला जोडणारा हा बायब्लियोग्राफिक डेटाबेस आहे. Connecting Repository या शब्दावरून CORE हा शब्द देण्यात आला आहे. CORE हा जगात प्रकशित होणाऱ्या विद्वत्तापूर्ण साहित्याचा, संशोधन लेखांचा एक व्यापक बायब्लियोग्राफिक डेटाबेस आहे ज्यात अनेक विशेष म्हणजे हे सर्व प्रकाशन मुक्त प्रवेश संशोधन पेपरांचे सर्वात मोठे संकलन देखील आहे. CORE हे पूर्णत मोफत सेवा असून या सेवेचा कोणत्याही प्रकारचा नफा मिळवण्याचा उद्देश नाही. CORE सेवा ही मुक्त प्रवेश मिशन या मोहिमेला समर्पित अशी ही सेवा आहे. CORE ही सेवा पूर्णत: Principles of Open Scholarly Infrastructure (POSI) च्या तत्त्वांवर कार्य करणाऱ्या सेवे पैकी एक सेवा असल्याचे उत्तम उदाहरण आहे. CORE व्दारे जागतिक संग्रह आणि जर्नलचा एक नेटवर्क असून याच्या मदतीने साहित्यांची शोधक्षमता वाढते तसेच उपलब्ध असलेल्या संसाधानांचा गैरवापर टाळता येतो. वेब च्या महाजाळ्यात विखुरलल्या संसाधनांना तसेच शोध निबंधांना त्यांच्या मेटाडेटाच्या मदतीने तसेच Persistent Identifiers (PIDs) व्दारे शोधून एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिला जातो. CORE व्दारे मेटाडेटाचे प्रमाणीकरण, साहित्य व्यवस्थापन व संवर्धन तसेच मुक्त प्रवेश अनुपालनासाठी संसाधने उपलब्ध करून डेटा उपलब्ध करून देणाऱ्या संस्थाना योग्य पद्धतीचा अवलंबण्यास समर्थन दिले जाते तसेच मुक्त संशोधनासाठी सर्व संसाधने ऑनलाईन पद्धतीने संगणकाच्या मदतीने हाताळण्यास उपलब्ध करून देते.

CORE या सेवेचा फायदा विविध विषयांत संशोधन करणाऱ्या संशोधकांना, शैक्षणिक संस्थांना, सर्व सामान्य वाचकांना, मुक्त संसाधने उपलब्ध करून देणाऱ्या प्रकाशकांना, विविध डिजीटल संग्रह विकसित करणाऱ्या संस्थांना तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रणालींना होतो. CORE या सेवेचा उद्देश : या सेवेचा मुख्य उद्देश जगभरात प्रकशित होणाऱ्या व उत्तम दर्जा असलेल्या संसाधनांची यादी करून त्यांना प्रत्येकासाठी कोणत्याही अडचणी शिवाय मुक्त प्रवेश देणे असा असून यासाठी काही विशेष प्रयत्न CORE च्या माध्यमातून केले जात आहे ते कोणते जाणून घेवूया,

- CORE व्दारे उपलब्ध करून देण्यात आलेले संसाधने शोधण्यासाठी अत्याधुनिक मजकूर आणि डेटा मायनिंग तंत्रज्ञानाचा वापर करून अभ्यासपूर्ण डेटा समृद्ध केला जात आहे.
- CORE या सेवेचा वापर करण्यास इतरांनाही नवनविन टूल्स चा वापर करून CORE या संकेतस्थळावर त्याचा प्रभावी वापर करण्यास प्रेरित केले जात आहे.
- नवनविन तंत्रज्ञानाचा वापर करून मुक्त प्रवेश संग्रह आणि शोध निबंधांच्या जाळ्याला विकसित करणे साठी प्रयत्न केला जात आहे.
- मुक्त प्रवेश हाताळण्यासाठी सर्वांना किफायतशीर आणि सोपी हाताळणी असलेले व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे.





**Figure. 1 COnnecting REpositories संकेतस्थळाचे मुखपृष्ठ**

**Source :** CORE – https://core.ac.uk

**4. CORE (COnnecting REpositories) सोबत कसे जोडले जाल :** सर्व प्रथम तुम्हाला COnnecting REpositories म्हणजेच CORE च्या संकेत स्थळाला भेट द्यावी लागेल. CORE चे आधिकारिक संकेतस्थळ https://core.ac.uk हे आहे. या साकेत स्थळाच्या तीन पर्याय उपलब्ध असतात.

- Become Data Provider (पुरवठादार व्हा) : याव्दारे पुरवठादारांना त्यांच्या कडील संसाधनांना CORE या संकेतस्थळाशी जोडून घेता येते व त्यांच्या संसाधनांना जागतिक समूह उपलब्ध करून डेटा येता येतो. मागील तीन महिन्याच्या कालावधीत जवळपास ७०० पेक्षा जास्त पुरवठादार CORE शी जोडले गेले आहे. तर गेल्या वर्षभरात १००० पेक्षा जास्त आणि आतापर्यंत १३००० पुरवठाव्दार CORE शी जोडले गेले आहे.
- Become a Member (सदस्य व्हा) : या पर्याया व्दारे कोणतीही व्यक्ती, संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी किंवा सामान्ज्य वाचक याचा सभासद होऊ शकतो. या साठी देखील तीन पर्याय दिले आहे, Starting, Support and Sustaining याच्या सहाय्याने CORE चे सदस्य होता येते, यांत सहभाग घेवून इतरांना ही मदत करता येते आणि याच्याशी कायम जुळून राहता येते.





**Figure. 2 CORE चे सदस्य होयाचे पर्याय**
**Source : CORE – https://core.ac.uk**

**Membership List**

Find Organisation

| Organisation name | Country | Membership status |
|---|---|---|
| AgEcon (University of Minnesota) | United States | USRN Partner |
| Anglia Ruskin University | United Kingdom | Supporting Member |
| Brunel University | United Kingdom | Sustaining Member |
| Cardiff University | United Kingdom | Supporting Member |
| Case Western University | United States | USRN Partner |
| City University, London | United Kingdom | Sustaining Member |
| Columbia University | United States | USRN Partner |
| CSUSB ScholarWorks | United States | USRN Partner |
| Harvard University | United States | USRN Partner |
| Human Sciences Research Council | South Africa | Sustaining Member |

**Figure. 3 CORE मध्ये सदस्य असलेल्या पुरवठादरांची काही निवडक यादी**
**( सविस्संतर यादी संकेतस्थळावर उपलब्ध आहे) Source : CORE – https://core.ac.uk**

**Explore Our Services (आमच्या सेवांचा वापर करा) :** CORE व्दारे मुक्त प्रवेश सेवा जगभरातील संशोधक, ग्रंथालये, प्राध्यापक, विद्यार्थी, वाचक आणि शैक्षणिक संस्थाना सेवा प्रदान केली जाते. CORE व्दारे पुरवठादार किंवा सदस्य त्यांच्या शोध निबंधांना सुयोग्य पद्धतीने संग्रहित करून उपलब्ध करून देऊन शकतात तसेच त्यांना शोधण्यासाठी उत्कृष्ठ पद्धतीचे मेटाडेटा, अनुक्रमणिका (Indexing) करून प्रभावी शोध पद्धती प्रदान करू शकतात.

**CORE व्दारे दिल्या जाणाऱ्या सेवा :**

**Access to Raw Data**





**Figure. 4 CORE मध्ये सदस्य असलेल्या सेवा**
**( सविस्संतर माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे) Source : CORE – https://core.ac.uk**

**Content discovery :**





**Figure. 5 CORE मध्ये सदस्य असलेल्या सेवा**
**( सविस्संतर माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे) Source : CORE – https://core.ac.uk**

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN(o): 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 7.384
Volume - 8, Issue - 5, May - 2025

**Managing content :**





**Figure. 6 CORE मध्ये सदस्य असलेल्या सेवा**
**( सविस्संतर माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे) Source : CORE – https://core.ac.uk**

**OAI identifiers & Bespoke Contracts:**





**Figure. 7 CORE मध्ये सदस्य असलेल्या सेवा**
**( सविस्संतर माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे) Source : CORE – https://core.ac.uk**

**CORE व्दारे संशोधन लेख कसे हाताळावे :** यासाठी सर्वात आधी CORE च्या संकेतस्थळाला भेट द्यावी लागेल. संकेतस्थळाच्या मुखपृष्ठावरच सर्च बार उपलब्ध करून दिला आहे. त्या सर्च बार वर क्लिक करून हवे त्या विषयावरील शोध निबंध किंवा साहित्य हाताळता येते. खालील दिलेल्या चित्रावरून अधिक स्पष्ट होईल.





**Figure. 8 CORE मध्ये उपलब्ध असलेले संसाधन शोधण्यासाठीचे पर्याय**
**( सविस्संतर माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे) Source : CORE – https://core.ac.uk**

या चित्रातून आपल्या लक्षात येईल कि मुखपृष्ठावर उपलब्ध असलेल्या सर्च बारचा वापर करून उपलब्ध असलेली माहिती प्राप्त होते. या प्राप्त झालेल्या माहितीला कमी किंवा जास्त करण्यासाठी किंवा अधिक परिणामकारक करण्यासाठी माहिती शोधण्यासाठी विविध पर्याय देण्यात आले आहे. यात मुख्यत: i) field ii) year iii) type iv) Author v) Language vi) Publisher यांचा समावेश आहे. या पर्यायाचा वापर करून हवी असलेली अचूक माहिती क्षणार्धात प्राप्त होते. यातील field आणि type पर्याय मधील उपलब्ध माहिती पाहुया.





**Figure. 8 CORE मध्ये उपलब्ध असलेले संसाधन शोधण्यासाठीचेfield पर्याय मधील माहिती**
**( सविस्संतर माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे) Source : CORE – https://core.ac.uk**





**Figure. 8 CORE मध्ये उपलब्ध असलेले संसाधन शोधण्यासाठीचे Type पर्याय मधील माहिती**
**( सविस्संतर माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे) Source : CORE – https://core.ac.uk**

वर दिलेल्या दोन्ही चित्रातून लक्षात येते कि , CORE व्दारे उपलब्ध करून देण्यात आलेले संसाधने किती रचनात्मक (Structured) आणि पद्धतशीर (Systematically) मांडलेली आहे. यामुळे याचा वापर करणे अधिक सोयीचे होते.

**5. निष्कर्ष :** देशभरातील संशोधकांसाठी CORE उपक्रम एक वरदान ठरू शकते. याव्दारे हजारो लाखो संशोधन साहित्यांची बिब्लिओग्राफक आणि फुल टेक्स्ट माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. सुरवातीला एका छोट्याशा संशोधन प्रकल्पातून निर्माण झालेली ही सेवा आज जागतिक पातळीवर नावलौकिक प्राप्त संशोधन सहाय्य सेवा म्हणून ओळखली जात आहे. याव्दारे जवळपास 413M पेक्षा दर्जेदार बहुभाषिक शोध निबंध अगदी मुक्त प्रवेश व विनामूल्य उपलब्ध होत असून ही एक गर्वाची बाब आहे. मुक्त प्रवेश चळवळ ही काळाची गरज असून याचा भविष्यात खूप मोठ्या प्रमाणावर वापर होईल. तसेच अनेक शैक्षणिक संस्था, कृत्रिम बुद्धिमतत्ता प्रणालीवर कार्य करणाऱ्या संस्था यांना देखील CORE चा खूप फायदा होईल यांत शंका नाही.

## संदर्भ :

1. https://www.unesco.org/en/open-access2. (access on 2025 May 1st)
2. D:\planner2008\Paper\Planner200 (access on 2025 May 1st)
3. https://nap.nationalacademies.org/read/11030/chapter/35 (access on 2025 May 1st)
4. https://blog.core.ac.uk/category/repositories/
5. https://en.wikipedia.org/wiki/Jisc
6. https://en.wikipedia.org/wiki/CORE_(research_service)
7. https://core.ac.uk/